# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## इ-निविदा सुचना ( तिस-यांदा)

क्र.जवमा/ 3230/2018 दि. 08/06/2018

सर्व जनतेस कळविण्यात येते कि, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे कै.बिंदु मंगल कार्यालय, महाराजा रणजितसिंघ मार्केट जुना मोंढा हे खालीलप्रमाणे इ निविदेद्वारे 03 वर्षासाठी भाडेपट्टीवर देण्यात येत आहेत.

सदरील मंगल कार्यालय भाडेपट्टीवर देणेबाबतची माहिती नियम व अटी, कार्यपध्दती, मंगल कार्यालयाचे आरक्षण, मंगल कार्यालयाचे भाडे व आपेक्षित अनामत रक्कम या बाबतची माहिती नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच ई-निविदा किंमत रू.1100/- व ई-निविदेची अनामत (EMD) रू 50000/- ऑनलाईन जमा करुन ई-निविदा ऑनलाईन वर खरेदी व जमा करता येईल.डीजीटल सिग्नीचर रजिस्ट्रेशन हे अनिवार्य आहे. तसेच ई-निविदा ही अनामत रक्कमे बाबत आहे.

निविदेत विहीत नमुन्याप्रमाणे स्कॅन करुन अपलोड करण्यात यावी ती प्रत पुर्ण दृष्य असली पाहिजे.

| अ.क्र | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रकाशित करणे | दि. 11.06.18 | 15.00 |
| 2 | ई-निविदा डाऊनलोड करणे | दि. 11.06.18 | 15.00 |
| 3 | ई-निविदा भरणे | दि. 11.06.18 | 15.00 |
| 4 | ई-निविदा भरण्याचा अंतीम दिनांक व वेळ | दि. 20.06.18 | 15.00 |
| 5 | ई-निविदा उघडणे | दि. 21.06.18 | 15.00 |

**आयुक्त**

नांदेड वाघाळा शहर महागरपालिका नांदेड
करीता

(स्थळ प्रतिवर मा.आयुक्त यांची स्वा/-)

**प्रतीलिपी,**

1) संपादक, **दै.गोदातीर, दै. रिपब्लीकन गार्ड** यांना देऊन कळविण्यात येते कि, आपल्या दि. **09/06/18** च्या वृत्तपत्रात **16 X 12** चौ.सेमी आकाराचे जाहीर सुचना छापून त्याचे दोन प्रतीत बील सादर करावे.
2) मुख्य लेखापरिक्षक,. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
3) अंतर्गत लेखापरिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
4) मुख्य लेखाधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
5) इ-निविदा विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
6) नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

# कै.दिगंबरराव बिंदु मंगल कार्यालय भाडेपट्टीवर देणे बाबत नियम व अटी

1) कै.दिगंबरराव बिंदु मंगल कार्यालय, जूना मोंढा, नांदेड हे तीन वर्षाकरीता भाडेपट्यावर राहील. निविदेची एक वर्षाच्या भाडेची सरकारी निविदा रक्कम रु.2100000/- एवढी राहील.

2) कै.दिगंबरराव बिंदु मंगल कार्यालय, हे एका वर्षाच्या भाडेच्या रक्कमेची निविदेमध्ये नमुद करावयाचे आहे. एक वर्षाचे भाडे हे सरकारी किमान देकार रक्कम रु.2100000/- राहील अपेक्षित भाडेची रक्कम येत नसल्यास योग्य ते भाडे रक्कमेवर देण्याचे अधिकार आयुक्त मनपा नांदेड यांना राहील. निवीदा अंतीम करण्यात आलेल्या भाडेची रक्कम अगावु महानगरपालिकेत जमा करावी लागेल नंतरच पुढील वर्षाकरीता परवानगी देण्यात येईल.

3) ज्याचे नांवे कै.दिगंबरराव बिंदु मंगल कार्यालय, भाडयाने देण्याचे अंतिम होईल त्यांना तीन दिवसांचे आत मनपाकेत आगाऊ एका वर्षाच्या भाडयाची रक्कम जमा करावी लागेल अन्यथा निविदा अनामत रक्कम जप्त करुन मनपा फंडात जमा करण्यात येईल. तदनंतर निविदा मागविण्यास येईल.

4) कै.दिगंबरराव बिंदु मंगल कार्यालय चालविणेसाठभ अनामत रक्कम रु.1000000/- बीन व्याजी मनपाकेत जमा करावे लागेल. मंगल कार्यालय सोडुन जाते वेळी इमारतीचे तोडफोड, थकित विजेचे बिल वगैरे सर्व बाबी पुर्ण चौकशी करुन त्या बद्दलचा खर्च वजा केल्यानंतरच शिल्लक राहीलेली रक्कम परत करण्यात येईल.

5) कै.दिगंबरराव बिंदु मंगल कार्यालय एका दिवसाचे आरक्षण भाडे हे निविदाधारकाने ठरविल्याप्रमाणे राहिल त्याप्रमाणेच नागरीकांना आरक्षण करुन द्यावे लागेल. आरक्षण नोंदवही ठेवावी लागेल सदर नोंदवही मनपा अधिकारी/कर्मचारी यांच्या पहाणीच्या वेळी उपलब्ध ठेवावी लागेल सर्व जाती धर्माच्या नागरीकांना सभागृह आरक्षण करुन द्यावे लागेल त्यात भेद भाव करता येणार नाही. फक्त शुद्ध शाकाहारी साठी मंगल कार्यालय आरक्षण करावे लागेल मांसाहरी करीता मंगल कार्यालय देता येणार नाही.

6) महानगरपालिकेचे कै.दिगंबरराव बिंदु मंगल कार्यालय ईमारत व त्यामधील विद्युत उपकारणे जसे की, पंखे, ट्युबलाईट, वायरींग, इत्यादी साहित्य ताब्यात देण्यात येईल. ईमारतीचे तोडफोड झाल्यास कै.दिगंबरराव बिंदु मंगल कार्यालय भाडयाने घेणाऱ्याने स्वखर्चाने दुरुस्त करावी लागेल व मुद्दतीनंतर ज्या स्थीतीत घेतली त्याच चांगल्या स्थितीत महानगरपालिकेस परत करावी लागेल मंगल कार्यालयात विद्युत मिटर असुन मंगल कार्यालय ताब्यात घेतल्या पासुन विद्युत बिल मंगल कार्यालय भाडयाने घेणाऱ्याने परस्पर महावितरण विद्युत मंडळाकडे भरणा करुन वेळोवेळी पावती मनपा सबंधीत अधिकाऱ्यास दर्शविण्यात यावी तसेच विद्युत मिटर मध्ये काही बिघाड झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मंगल कार्यालय भाडयाने घेणाऱ्याची राहील.

7) कै.दिगंबरराव बिंदु मंगल कार्यालय येथे नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येईल पाणी कर नियमानुसार दर महिन्यास मनपाकडें जमा करावा लागेल किंवा स्वखर्चाने व्यवस्था करुन घेऊन पाणी घेता येईल.

8) कै.दिगंबरराव बिंदु मंगल कार्यालय आरक्षण धारकांस डेकोरेशन व ईतर सुविधा देता येईल. परंतु त्या संबंधी नागरीकांचे काही तक्रार राहणार नाही त्याचे समाधान करण्याची जवाबदारी मंगल कार्यालय भाडयाने घेणाऱ्याची राहिल.

9) कै.दिगंबरराव बिंदु मंगल कार्यालय भाडयाने दिल्यानंतर काही वाद उपस्थीत झाल्यास आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचा निर्णय अंतिम राहील.

10) मंगल कार्यालयात काही अनुचित प्रकार, दुर्घटना होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल व याची सर्वस्वी जबाबदारी निवीदाधारकाची राहील.

11) मंगल कार्यालयाचे शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेले कर जसे GST कर व इतर कर निविदा धारकास भरावे लागेल. व वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करावे लागेल.

12) वरील नियम व अटीचे पालन न केल्यास भाडेपट्टा संपुष्टात येईल तसेच जमा अनामत रक्कम आणि जमा केलेली भाडेची रक्कम जप्त करुन महानगरपालिका फंडात जमा करुन घेण्यात येवुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 81-ब मधील तरतुदी नुसार मंगल कार्यालय रिकामे करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

वरील प्रमाणे सर्व नियम व अटी संबंधी करारनामा करुन देवुन मालमत्ता व्यवस्थापक,मनपा नांदेड यांचे कडुन ताबा घ्यावा लागेल.

आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

का.अ. मा.व्य.